महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
सीआयएन : यु४०१०९एमएच२००५एसजीसी१५३६४५
दुरध्वनी क्र. २६४७४७५३ (वै)/२६४७४२११ (का)
फॅक्स क्र. २६४७२३६६
ईमेल : cecomm@mahadiscom.in
संकेतस्थळ : www.mahadiscom.in
प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड
प्रो. अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व)
मुंबई- ४०० ०५१

**क्र. पीआर-३/सबसिडी/** 29912

**दिनांक :** 1 AUG 2015

**वाणिज्य परिपत्रक क्र. २४४**

**विषय :-** राज्यात माहे फेब्रुवारी व मार्च, २०१५ मध्ये अवेळी पाऊस व गारपीट यामुळे झालेल्या जीवित व वित्तहानीपोटी आपद्ग्रस्तांना मदत व सवलत देण्याबाबत.
- कृषीग्राहकांना तिमाही वीज बिलात माफी.

**संदर्भ :-**१) शासन निर्णय क्र. सीएलएस २०१५/प्र.क्र. २/म-३ दिनांक ०४/०२/२०१५.
२) वाणिज्य परिपत्रक क्र. २४२ दि.२०.०५.२०१५.
३) शासन निर्णय क्र. सीएलएस २०१५/प्र.क्र. ४०/म-३ दिनांक १३/०४/२०१५.

राज्यात माहे नोव्हेंबर व डिसेंबर २०१४ मध्ये अवेळी पाऊस व गारपीट यामुळे झालेल्या जीवीत व वित्तहानीपोटी आपद्ग्रस्तांना मदत देण्याबाबत शासनाने संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयानुसार निर्णय घेतलेला होता. सदर निर्णयानुसार माहे नोव्हेंबर-डिसेंबर २०१४ या कालावधीत अवेळी पाऊस व गारपीट यामुळे बाधित कृषी ग्राहकांना त्यांचे तिमाही वीज बिलात माफी देण्याबाबत निर्देशित केलेले आहे.

शासन आदेशानुसार माहे नोव्हेंबर-डिसेंबर २०१४ या कालावधीत अवेळी पाऊस व गारपीट यामुळे बाधित गावांची व कृषी ग्राहकांची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अथवा सक्षम स्थानिक महसूल अधिका-यांकडून प्राप्त करुन बाधित कृषी ग्राहकांना जानेवारी, फेब्रुवारी व मार्च -२०१५ या त्रैमासिकाची वीज देयके माफ करण्यात यावीत असे निर्देश संदर्भ क्र.२ च्या वाणिज्य परिपत्रकाद्वारे सर्वक्षेत्रिय अधिका-यांना देण्यात आलेले होते.

शासनाने संदर्भ क्र. ३ च्या शासन निर्णयानुसार माहे फेब्रुवारी व मार्च -२०१५ या कालावधीत अवेळी पाऊस व गारपीट यामुळे झालेल्या जीवित व वित्तहानीबाबत बाधित आपदग्रस्त कृषी ग्राहकांना त्रैमासिक वीज बिलात माफी देण्याचा निर्णय घेतलेला आहे.

सर्व क्षेत्रिय अधिका-यांना कळविण्यात येते की, शासनाने पुन्हा फेब्रुवारी व मार्च २०१५ मध्ये अवेळी पाऊस व गारपीट यामुळे बाधित कृषी ग्राहकांना संदर्भ क्र.३ च्या शासन निर्णयानुसार त्रैमासिक वीज बिलात माफी देण्याचे जाहीर केल्याच्या अनुषंगाने सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी खालीलप्रमाणे करण्यात यावी.

१) फेब्रुवारी २०१५ व मार्च २०१५ मध्ये अवेळी पाऊस व गारपीट यामुळे बाधित कृषी ग्राहकांना एप्रिल, मे व जून २०१५ या त्रैमासिकातील वीज बिलात माफी देण्यात यावी.

२) नोव्हेंबर व डिसेंबर २०१४ मध्ये अवेळी पाऊस व गारपीट यामुळे बाधित ज्या कृषी ग्राहकांना जानेवारी, फेब्रुवारी व मार्च २०१५ या वीज बिलात माफी देण्यात आलेली आहे. परंतु फेब्रुवारी २०१५ व मार्च २०१५ मध्ये अवेळी पाऊस व गारपीट यामुळे जे कृषी ग्राहक पुन्हा बाधित झालेले आहेत. अशा ग्राहकांना सुध्दा सदर वीज बिल माफीचा पुर्नलाभ देण्यात यावा. म्हणजेच अशा कृषी ग्राहकांना एप्रिल, मे व जून २०१५ या त्रैमासिकातील वीज बिलात माफी देण्यात यावी.

३) सदर त्रैमासिकाचा कालावधी संपुष्टात आल्यास सदर माफी पुढील त्रैमासिक वीज बिलामध्ये वळती करण्यात यावी.

४) क्षेत्रिय कार्यालयांनी फेब्रुवारी व मार्च २०१५ मध्ये अवेळी पाऊस व गारपीट यामुळे बाधित इतर कृषी ग्राहकांची माहिती जिल्हाधिकारी कार्यालय अथवा सक्षम महसुल अधिका-यांकडून प्राप्त करुन घेण्यात यावी.

शासन आदेशाप्रमाणे आपद्ग्रस्त कृषी ग्राहकांना एप्रिल , मे व जून -२०१५ या त्रैमासिकाची वीज बिले माफ करण्यात आल्यावर शासनावर पडणा-या आर्थिकभाराच्या रकमेची परिगणना माहिती व तंत्रज्ञान विभागाने करावी, जेणेकरुन शासनाकडे प्रतिपूर्तीच्या रकमेच्या पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव पाठविण्यात येईल.

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत रवाना :- प्रेषण यादिप्रमाणे**

**प्रत सस्नेह रवानाः-**

मुख्य महाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान), महावितरण, मुंबई.

-- आपणांस कळविण्यात येते की, वरील विषया संदर्भात अवेळी पाऊस व गारपीटग्रस्त कृषी ग्राहकांना एप्रिल, मे व जून -२०१५ ची वीज बिले शुन्य रक्कमेची आकारल्यानंतर वितरण कंपनीवर पडणा-या आर्थिक भाराची परिमंडळ व ग्राहक संख्यानिहाय माहिती त्वरीत पाठविण्यात यावी. जेणेकरुन शासनाकडून आर्थिक पूर्ततः करण्याकरीता प्रस्ताव पाठविण्यास मदत होईल.